*Indian Streams Reserach Journal*
*Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4*  **ISSN:-2230-7850**

**Research Papers**

# तुलनात्मक साहित्याभ्यासाची उपयुक्तर्ता एक चिकित्सक अभ्यास

डॉ सुरेखा बनकर वादाडे
दयानंद कला महाविद्यालय. लातूर

## *प्रस्तावना :–*

'साहित्यनिर्मिती' हा प्रत्येक समाजजीवनातील आवश्यक घटक आहे ती एक कला आहे तिच्यातील विविधतेतून 'एकात्म आंनद' अनुभवता येतो . त्याचप्रमाणे तिचे खरे स्वरूप शोधता येते त्यासाठी विविध शोधपद्धतीचा आधार घेतला जातो.

साहित्य संशोधनात योग्य त्या परिस्थितीप्रमाणे आवश्यक अनेक संशोधनपद्धती उपयोगात आणल्या जातात त्यात प्रामुख्याने नवार्थदर्शक शोधपद्धती विश्लेषणात्मक शोधपद्धती तुलनात्मक शोधपद्धती विकासात्मक शोधपद्धती कार्यकारणपर शोधपद्धती आणि वर्ननात्मक शोधपद्धती इ. पद्धती अवलंबिल्या जातात यात तुलनात्मक अभ्यासपद्धती ही मराठी साहित्याच्या संशोधनात अलिकडे मुख्यत्वेकरून वपरली जाते. तौलनिक अभ्यासात आकलन अधिक नेमके व आस्वाद रूचिपूर्ण होतो कार्यकार्यकारणाची साखळी तयार करून साहित्यविषयक बाबींचे स्पष्टीकरण देणे शक्य होते. याच अनुषंगाने प्रसिद्ध लेखक रेनेवेलेक याने तौलनिक वाङ्मयाभ्यासपद्धतीचे फलित काय ? या प्रश्नाचे चांगले व नेमके उत्तर देतांना म्हटले आहे की " To be able to describe the exact share of the one and the other would amount to knowing much that is worth knowing in the whole of literary history." 1 यावरून तौलनिक अभ्यासपद्धतीची उपयुक्तता सहजपणे लक्षात येते .

**1)** विविध साहित्यकृतींची तुलना ः तुलनात्मक अभ्यासपद्धतीमुळे ललित काव्य कादंबरी नाटक आत्मचरित्र इत्यादींचा कालखंड लेखक प्रेरणा प्रभाव साहित्य समीक्षा व्याकरण भाषा कथा निंबध चरित्र अशा विविध साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास या पद्धतीमुळे करता येतो . अशा प्रकारच्या साहित्यकृती या भिन्न भाषिकही असू शकतात मात्र तुलनात्मक विषय हा जितका सिमीत असेल तितिके त्याचे विवेचन सर्वागपूर्ण व सखोल होणे शक्य होते थोडक्यात साहित्याच्या विभिन्न अंगाचा तुलनात्मक अभ्यास करता येणे हा महत्वाचा उपयोग या पद्धतीचा सांगितला जातो.

**2)** एखाद्या भाषेविषयीचे गैरसमज दूर होतात ः संशोधनकार्य हे मूलतः कोणत्याही देशाचे समाजाचे गौरवस्थान असते तुलनात्मक संशोधनकार्य राष्ट्रहिताच्या दृष्टिने अत्यंत आवश्यक आहे . भाषासाहित्यातील संशोधनाने भाषेच्या अभेद्य भिंती कोसळतात एखादया भाषेविषयी असणारे अपसमज पूर्व ग्रह दूर होतात एखादया भाषेस आपण समृद्ध उन्नत संपन्न मानत नाही परंतु तुलनात्मक संशोधनाने त्या भाषेचे अपार सौदर्य व वैभव आपणास ज्ञान होण्यास मदत होते त्याबरोबर आपले त्या भाषेविषयी असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होते.

**3)** भारतीय भाषा व साहित्य यांच्या विकासास अनुकूल ः स्वातंज्यप्राप्तीनंतर भारतीय भाषा यांच्या विकासास अनुकूल भूमी प्राप्त झाली असे म्हणावयास हरकत नाही या काळात अनेक विद्यालये महाविद्यालये विद्यापीठे उदयास येऊन त्यांच्या माध्यमातून विभिन्न भारतीय भाषा व साहित्य यांचा सर्वांगीण अभ्यास सुरू झाला भारतीय भाषा व साहित्यबरोबरच विदेशी साहित्याभ्याची सोय करण्यात आली अनेक विदेशी विज्ञान भारतात येऊन भारतीय साहित्याचा अभ्यास करू लागले आणि म्हणून तुलनात्मक साहित्याभ्यासात याचा उपयोग होऊलागला.

**4)** भारतीय राष्ट्रीत्वाची जाण वाढीस लागते ः भारतीय भाषांमधील साहित्याच्या तुलनेत भारतीय संस्कृतीचा फार मोठा दुवा जोडलेला असल्यामुळे काही गोष्टीत समानता येणे अपरिहार्यच आहे अशा प्रकारच्या तुलनेमधून विभिन्न भाषी साहित्यातील साधर्म्य वैधर्म्य लक्षात येऊन त्याची कारणमीमांसा केल्याने भारतीय राष्ट्रीयत्वाची जाणही वाढीस लागण्याची शक्यता आहे याचप्रमाणे विदेशी भाषांच्या साहित्याचीही पांरपरिक तुलना राष्ट्रीय स्तरावर करता येते भारतीय व विदेशी भाषांतील साहित्याची तुलनाही काही प्रमाणात झालेली आहे. ती अजून मोठया प्रमाणावर होणे शक्य आहे त्यातून देवाणघेवाण सहज लक्षात येऊशकते उदा ः अशाप्रकारच्या तुलनात्मक अभ्यासाने मानवी साधर्म्याची जाणीव झाल्याने भाषेच्या अज्ञानामुळे पडलेलु संकुचित मर्यादा आपोआप नष्ट होतील व 'वसुधैव कुटुंबाकम् ची भावना जोपासली जाऊशकेल.

**5)** कोणत्याही विषयाच्या तुलनेसाठी उपयुक्त ः तुलनात्मक अभ्यासपद्धतीचा उपयोग केवळ साहित्याच्या क्षेत्रात भिन्न साहित्यकृतीचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी होतो. असे नसून वैज्ञानिक क्षेत्रात आणि विविध संस्थापक घटनांचा

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

तसेच अलिकडे औघोगिक क्षेत्रात संशोधनासाठी तुलनात्मक पद्धतीचा वापर करून घेण्यावर भर दिला जात आहे. कारण विविध घटकांची सर्वांगीण तुलना करण्यासाठी ही तुलनात्मक पद्धत अत्यंत उपयुक्त असते.

**6)** परभाषेतील साहित्यकृतीचा आधार घेऊन काही साहित्यकृती निर्माण होतानां दिसतात अशावेळी आधरित साहित्यकृतीची मूळ साहित्यकृतीशी तुलना करणे आवश्यक ठरते अशा तौलनिक साहित्याभ्यासात त्या दोन्हीही साहित्यकृतीच्या तुलनीय संहिताचा शोध छाननी आणि निश्चिती करण्यासाठी ही पद्धती उपयुक्त ठरते.

**7)** एका भाषेतील साहित्याची नोंद अनेक प्रकारांनी दुस-या भाषेतील साहित्यात घेतली जाते. भाषातर रूपातर अनुवाद पुननिर्मिती अशा अनेक रूपांनी पारिभाषिक श्रेष्ठ साहित्यकृतींच्या अशा पडसांदाच अभ्यास करण्यासाठी तौलनिक अभ्यासपद्धती अधिक उपयुक्त ठरते.

**8)** जुन्या अभ्यासास नवी दृष्टी प्राप्त होऊशकते ः  संस्कृत मूळ ग्रंथापासून त्याचे मराठी अविष्कार वेगळे झाल्याने त्याची तुलना करणे हा अभ्यासाचा एक महत्वाचा भाग ठरतो समकालीन जीवनाचे साद पडसाद इच्छा आकांक्षा श्रद्धा निष्ठा त्यात सहजपणे प्रतिबिंबित झाल्या त्यामुळे मराठी कृतींना काहीअंशी तरी निराळे स्वरूप प्राप्त झाले अशाप्रकारे पुराणे संप्रदाय लोकपरंपरा यांनी संस्कारित झालेले मूळ ग्रंथ त्यांच्या मराठीकरणाची परंपरा बदलेला काळ मध्ययुगीन मुल्यांचा अनुप्रवेश समकालीन समाजाची स्पंदने या सर्व गोष्टीमूळे जुन्या मराठी कवीच्या हातून मूळ ग्रंथ बदलत गेले अशा प्रकारे निष्कर्षात्मक स्वरूपाचा अभ्यास तुलनात्मक अभ्यासपद्धतीचा उपयुक्त भाग ठरतो .
उदा ः श्रीधर चरित्र आणि 'काव्य विवेचन' मधून चिं. नी. जोशी यांनी 'पांडवप्रतापा' ची अशी तौलनिक चर्चा केली आहे विष्णुदासनाम्याच्या महाभारताचा विवेचनात्मक अभ्यास या प्रबंधातून सरोजिनी शेंडे यांनी विष्णुदासांच्या रचनेचा तौलनिक अभ्यास मांडला आहे मोरोपंताच्या 'अर्याभारता' ची रसग्राही तुलना ग. रा. हवालदारांनी 'भारतामृत' मध्ये केली आहे.

**9)** भाषावंशाच्या विकास विस्तारासाठी ः मानवी भाषांचा इतिहास हा खरोखर मुळात एकाच भाषावंशाच्या विकास विस्ताराची कथा होय या वंशिक संबंधामुळे विद्यमान भाषांत त्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास परस्पर साम्य सापडतात म्हणजे विद्यमान भाषांची परस्पर तुलना करून म्हणजे त्यांच्या तौलनिक पद्धतीने अभ्यास केल्यास त्यात जी साम्य व वैषम्ये सापडतात त्यांचा खुलासा त्या भाषा एकाच वंशाच्या विकासाच्या विविध अवस्थेतील वैशिष्टये होत असे मानल्यानेच होऊशकते.

यााव्यतिरिक्त तौलनिक भाषाभ्यासाच्या उपयुक्ततेसंबंधी बारकाईने विचार केल्याने पुढील उपयोग लक्षात घ्यावेच लागतील.

**10)** साधर्म्य - वैधर्म्याची कारणमीमांसा ः भिन्न भिन्न प्रदेशात असून दोघांची भाषा वेगळी असूनही त्यांच्यामध्ये आढणारे साम्य पाहून जिज्ञासा उत्पन्न होणे स्वाभाविक आहे ज्ञानेश्वर व तुलसीदास संत एकनाथ व तुलसीदास संत एकनाथ व सूरदास नरसी मेहता व एकनाथ मीराबाई व बहिणाबाई पुंरदरदास व नामदेव रामदास व तुलसीदास कबीर व तुकाराम प्रेमचंद व हरिभाऊ आपटे भारतेंदु व केशवसुत बालकवी व वर्डस्वार्थ इ. साहित्यिकांचा तुलनात्मक अभ्यास अत्यंत उपयोगी आहे. त्यांच्यामध्ये दिसर्णाया साधर्म्याच्या वैधर्म्याच्या साहाय्यानेच या तुलनात्मक अध्यायनाची सुरूवात होते व संशोधनामध्ये विश्लेषण विवेचन केल्यावर साधर्म्य वैधर्म्याची कारणमीमांसा सष्ट होते बर्याचवेळा दोन लेखकांमधील साम्य पाहून अगोदर जो होऊगेला त्याचा नंतरच्या लेखकावर प्रभाव म्हणण्याची प्रथा आहे पण बरेच असे घडतही नाही पहिल्याचे वाड्मयही भाषा भिन्नतेमुळे म्हणा किंवा अन्य कारणाने म्हणा ज्याने वाचलेले नसते तेव्हा समानतेची इतरही कारणे असू शकतात हेसुद्धा या अभ्यासाने समजते व आपली दृष्टी अधिक तटस्थ होते.

**11)** साहित्यामगील प्रेरणा प्रभावाचा मागोवा घेता येतो ः एखादा श्रेष्ठ साहित्यिक किंवा एखाद्याचा महत्वपूर्ण विचार लेखकाला इतका प्रभावित करीत असतो की हा प्रभाव त्याच्या लेखनातून पदोपदी व्यक्त होत असतो कधी कधी एकाद्या विशिष्ट कवीपासून किंवा विचार सूत्रापासत्रून लेखकाला प्रेरणा प्राप्त होत असते .कित्येक वेळा विशिष्ट तत्वविचार किंवा सामाजिक विचार कुठल्या एका प्रादेशिक साहित्यालाच नव्हे तर देशाच्या बर्याच मोठया भूखंडाला प्रभावित करीत असतो. परिणामी अनेक भाषांतील साहित्यामध्ये एकच विशिष्ट विचारप्रवाहाचे प्रतिबिंब दिसणे स्वाभाविक आहे कधी कधी एकच विचार स्थलकालाप्रमाणे परिवर्तित होतांनाही दिसतो अशाप्रकारे साहित्यातील प्रेरणा प्रभाव इ. चा मागोवा घेणे अत्यंत उपयोगी असते शेक्सपियरचा मराठी नाटकावरील प्रभाव भारतीय साहित्यांवर रामायण महाभारताचा प्रभाव हिंदी व मराठी भक्तिसाहित्यात प्रकट झालेला अद्वैतवाद इ. अनेक विषय या विभागात समाविष्ट होतात.

टसेच काव्याभ्यासामध्ये भिन्न भाषांतील प्रेरणा व प्रभाव तुलनात्मक अभ्यासाने तपासता येतील विषय व शैलीच्या दृष्टिनेही अभ्यास होऊ शकतो हिंदी व मराठीतील भक्तिकाव्य निर्गुणकाव्य कामकाव्य वीरकाव्य शृंगारकाव्य नीतीकाव्य इ. वर तुलनात्मक अभ्यास सादर झालेले आहेत यावरून तुलनात्मक साहित्याभ्यासाच्या उपयुक्ततेची साक्ष पटते.

**12)** भक्तिसाहित्याची तुलना शक्य ः  मध्ययुगीन कालखंडात थोडयाफार प्रमाणात सर्वच भारतीय भाषांतील साहित्यात भक्तिसाहित्याचीच रचना का आढळते ऋ त्यातही कुठे रामसाहित्याचे प्राधान्य तर कुठे कृष्ण अथवा अन्य देवतेचे महत्व दिसते एकाच देवतेची रूपे एकाच वेळचे साहित्यामध्ये थोडयाफार फरकाने वेगळी का दिसतात ऋ आधुनिक साहित्याचा आरंभ कुठे अगोदर कुठे उशिरा का ऋ अशा एका ना दोन अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी कालखंड अथवा युगानुसारी तुलनात्मक अभ्यासाची अत्यंत आवश्यक आहे. या अभ्यासामुळे विभिन्न साहित्य परंपरांची कारणमीमांसा होऊन आजपर्यत मनात दडलेल्या जिज्ञासा पूर्ण होण्यास मदत होईल.

**13)** भिन्न भाषिक लोकसाहित्याच्या तुलनेकरीता ः  सर्वच प्रांतामधून विपुल लोकसाहित्य प्रसिद्ध झाले असून त्याच्या विविधांगाचा स्वतंत्र अभ्यास होऊलागला आहे भिन्न भाषांकधील लोकवाड्मयाचा तुलनात्मक अभ्यास मानवीय संवेदनांची समता व सर्व व्यापकतेचे निरीक्षण करण्यास अत्यंत उपयुक्त आहे. हिंदीमध्ये वीररसयुक्त पवाडा अस्तित्वात नसून ही केवळ महाराष्ट्राचीच देणगी आहे अशा थाटात मिरविर्णायांचा या तुलनात्मक अभ्यासाने खचितच भ्रमनिरास होईल हिंदी भाषेत व तिच्या उपभाषेत अशाप्रकारे वीररसयुक्त पवाडे केवळ उपलब्धच नसून ते अत्यंत लोकप्रिय असल्याने दिसून येते आपण ज्याला पवाडा म्हणतो त्याला हिंदीमध्ये 'पमरा' किंवा 'पवॉरा' असे म्हणतात म्हणजेच नावतही साम्य पाहण्यासारखे आहे.

**14)** दलित साहित्यातील जाणीव शोधता येतील ः दलित साग्त्यिाच्या तुलनात्मक साहित्याभ्यासाने वेगवेळया साहित्यामधील जाणीवांच्या स्वरूपांचे तपशील व कारणे उद्‌बोधक ठरते मराठी व कानडी दलित कवितेतील सामाजिक जाणीवा बंगाली व मराठी कांदबरीतील दलित समस्या इ. अनेक विषयांचा तुकानात्मक साहित्याभ्यासा करणे शक्य आहे या अभ्यासामुळे मानवी मनातील सारखेपणाची जाणीवही आपणास होऊशकते.

**15)** शैली वैशिष्टे व व्याकरणिक विशेषांचा तुलनात्मक अभ्यास अत्यंत उपयुक्त ः  हिंदी व मराठी साहित्यातील समान शब्दावली हिंदी व मराठीतील निबंधाचे शैलीगत अध्ययन हिंदी व मराठीतील फार्शी व इंग्रजी शब्द मराठी व कन्नड व्याकरण ः एक तुलनात्मक अध्ययन मराठी व तमिळ भाषेतील तत्सम संस्कृत

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

शब्दावली इ. विषय यामध्ये समाविष्ट होऊशकतात अशाप्रकारच्या अध्ययनाने एकमेकांपासून दूर वाटणार्या भाषांमध्ये जवळीक उत्पन्न होण्याची शक्यता असून बराचसा भ्रमनिरासही होऊशकतो कधी कधी एक शब्द दोन भाषांमध्ये वेगवेगळे अर्थ व्यक्त करतो हिंदीतील भोजपुरी या बोलीतील बरेचसे शब्द मराठी भाषेशी मिळते जुळते आहेत हे पाहून आश्चर्य व अशा स्थितीत दोन्ही भाषांत समान असणारे शब्द जेव्हा हिंदीत येतात तेव्हा साहजिकच मराठी माणूस अज्ञानामुळे हिंदीवर मराठीचा प्रभाव आहे असे म्हणून बाजूला होतो पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच असते

16) भाषांच्या वाङ्मयाच्या इतिहासाचा तुलनात्मक अभ्यास बोधप्रद ठरतो : दोन भिन्न भाषांच्या वाङ्मयाच्या इतिहासाचा तुलनात्मक अभ्यास अनेक दृष्टिनी बोधप्रद ठरतो वाङ्मयाच्या इतिहासाची सुरूवात कालखंडाची मांडणी विभाजन तत्कालिन सामाजिक आर्थिक राजनैतिक परिस्थिती तत्कालिन कृतीचे मूल्यमान विशिष्ट विचारधारा तत्कालिन साहित्याची वैशिष्ट्ये इ. अनेक गोष्टीतील साम्य आणि वैषम्य त्यांची कारणमीमांसा तुलनात्मक साहित्याभ्यासानेच शक्य होते

17) नाटक व कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास : काव्याच्या खालोखाल कमशः नाटक व कादंबरीच्या तुलनात्मक अभ्यासाची संख्या दिसून येते यामध्येही ऐतिहासिक पौराणिक सामाजिक सांस्कृतिक राजनैतिक असे वर्गीकरण करून अशाच विशिष्ट नाटकांचा अथवा कादंबर्यांचा तुलनात्मक अभ्यास होऊशकतो नाट्य अथवा कादंबरीमधील ठळक व्यक्तिरेखा हिंदी मराठी नाटकांचे रंगशिल्प हिंदी मराठी नाटकातील संवाद इ अनेक विषयांवर हा अभ्यास करता येतो मराठी गुजराती वा मराठी व बंगाली नाट्यशिल्पाचा तुलनात्मक अभ्यास अत्यंत उपयुक्त व अनेक जिज्ञासांवर प्रकाशाचा झोत टाकू शकतो

18) इतिहासाधिष्ठीत ललित साहित्याचा तौलनिक अभ्यास : प्रतिज्ञेने इतिहास आणि वृत्तीने साहित्य असलेले लेखन प्रादेशिक भाषांतून झालेले आढळते उदा : गीते वंशावली बुरंजी (आसाम) राजवंशावली व चरितकाव्ये (कन्नड व तेलुगु) रासो (हिंदी) पोवाडा बखर ( मराठी ) इ. रूपातून असे लिखाण व्यक्त झालेले आहे. या सर्व प्रादेशिक भाषेतील अशाप्रकारच्या साहित्यातील भारतीयांची इतिहास दृष्टी गद्य – पद्य माध्यमाचे ऐतिहासिक आशयावरील परिणाम इतिहास आणि साहित्य यांचे परस्पर संबंध अशा अनेक दृष्टिने तौलनिक अभ्यास करता येईल

19) स्त्री साहित्यिकांच्या तौलनिक अभ्यासास उपयुक्त : एकूण भारतीय साहित्यात स्त्री साहित्यिकांच्या सहभागाचा विचार केला असता कवयित्रींचा वाटा तसा अल्प राहिलेला आहे त्याची कारणे भिन्न असू शकतील परंतु ज्या अल्प प्राचीन कवयित्रींनी साहित्यात सहभाग दिला त्यात प्रामुख्याने मुक्ताबाई (ज्ञानदेव) ( जनाबाई(नामदेव ) वेणाबाई ( रामदास ) महदंबा (चकधर) कनकलता ( शंकरदेव ) अक्कमहादेवी ( बसवेश्वर ) या स्त्री कवयित्रींची कविता भारतीय संत कवयित्रींच्या आधाराने लिहिली गेली. संत कवी आणि कवयित्री यांचा वृक्षवेलीसारखा संबंध भारतभर दाखविता येण्यासारखा आहे एवढेच नव्हे तर मराठी शिवाय हिंदी कानडी या भाषेतीलही कवयित्रींची संख्या त्यांचा दर्जा समकालीन साहित्यप्रवाहाशी असलेले त्यांचे नाते त्याच्या कवितेतील प्रादेशिक वेगळेपण वेगवेगळया प्रांतातील स्त्रीयांची सामाजिक स्थिती आणि तिचा त्याच्या काव्यावर झालेला परिणाम अशा अनेक अंगांनी स्त्री साहित्यिकांचा व कवयित्रींचा तौलनिक अभ्यास करण्यासाठीही पद्धती उपयुक्त ठरते

तौलनिक साहित्याभ्यासाच्या उपयुक्तेविषयी एका वेगळया जाणीवेच्या संदर्भातून विचार करताना डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या 'तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना आणि प्रारूप' या ग्रंथात मांडलेल्या विचारांची नोंद घेणे आवश्यक वाटते त्यांनी तौलनिक साहित्याभ्यासाच्या उपयुक्ततेविषयीचे जाणीव " विश्वातील कांतीप्रकिया" असे वर्णन केलेले आहे त्याआधारे तौलनिक साहित्य अभ्यासाच्या उपयुक्ततेविषयी पुढील मुद्दे सांगता येतील

1. तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने अभ्यासकाच्या जाणीव विश्वात कांती घडून येते विविध भाषांच्या व वाङ्मयीन कलाकृतीच्या अभ्यासामुळे एक भाषिक संस्कारातून रूजलेल्या संकुचित धारणा नष्ट होऊन व्यापक भान येते आपला प्रदेश आपली संस्कृती आपली भाषा यांच्या अस्मिता बलशाली व ताठर बनलेल्या असतात. तौलनिक साहित्याच्या अभ्यासातून ही ताठर व एकांगी भूमिका गळून पडते. आणि एक प्रकारची सांस्कृतीक प्रगल्भता इतर भाषिक वाङ्मयाच्या अभ्यासातून वाचकात संकमित होते

2. आपले जे जे आहे ते सर्वच श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती अज्ञानातून आकार घेत असते. पण आपल्या सांस्कृतिक परंपरेपेक्षाही इतर सांस्कृतिक मूल्यव्यवस्था अधिक श्रेष्ठ असू शकते याचे भान तौलनिक पद्धतीद्वाराच येऊशकते किंबहुना आपल्या सांस्कृतिक पर्यावरणातही काही दोष व करूपता असल्याची वास्तवता तौलनिक अभ्यासामुळे जागृत झालेल्या विवेकातूनच लक्षात येते

3. भिन्न भिन्न भाषांतील वाङमयीन कृतींच्या तौलनिक अभ्यासातून आपल्या व इतरांच्या संस्कृतीमधील किंवा भाषिक व्यवहारामधील गुण व दोषांची सम्यक जाणीव अभ्यासकाला होत असते. हा सांस्कृतिक विवेक सार्वजनिक जाणीवेत प्रतिबिंबित होऊन देशादेशांतील मानवीय संबंध अधिक मूल्यात्मक होण्यास मदत मिळते तेव्हा विश्वमानवाच्या सुरक्षिततेसह विकसित संस्कृतीकरणासाठी व्यापक अर्थाने तौलनिक साहित्याचा अभ्यास महत्वाचा ठरतो

याशिवाय अनेक विषय उपलब्ध होऊशकतील की ज्यांचा दोन अथवा अनेक भाषांमधील साहित्याचा तुलनात्मक अभ्यास करता येईल विशेष प्रसिद्ध व लोकप्रिय अशा साहित्यग्रंथाची अथवा कृतींची तुलना करणे उपयोगी ठरेल

संदर्भ :

1 ) तौलनिक साहित्यभ्यास : तत्वे आणि दिशा – डॉ चंद्रशेखर जहागिरदार
2) तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाडमय – डॉ र. बा. मंचरकर
3) तौलनिक अभ्यास : संकल्पना आणि प्रारूप– डॉ श्रीपाल सबनीस
4) तौलनिक साहित्यभ्यास – प्रा. बंसत बापट